सकाळ
पुणे, रविवार,
१२ जून २०१६

# स. प. महाविद्यालयात 'शतजन्म शोधिताना' कार्यक्रम

## सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांची उपस्थिती

**पुणे, ता. ११ :** शिक्षण प्रसारक मंडळीचे सर परशुरामभाऊ महाविद्यालय बुधवारी शताब्दी वर्ष पूर्ण करत आहे. त्यानिमित्त 'शतजन्म शोधिताना' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष अॅड. एस. के. जैन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. यानिमित्त महाविद्यालयाने पुढील १० वर्षांचा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आराखडा मांडणारे 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार केले आहे. त्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. या वेळी शिक्षण प्रसारक मंडळीचे उपाध्यक्ष श्रीकृष्ण चितळे, सदस्य केशव वझे, प्राचार्य डॉ. दिलीप सेठ उपस्थित होते.



**श्रीनिवास पाटील**

डॉ. सेठ म्हणाले, ''महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीसाठी 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार केले आहे. यामध्ये तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणावर भर दिला आहे.

महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी 'एसपी इन्फो' नावाचे नवे 'मोबाईल अॅप' विकसित केले आहे. महाविद्यालयाचे 'अॅकॅडमिक ऑडिट' केले जाणार आहे. विद्यार्थ्यांमधील ज्ञानाला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'बिझनेस इक्युबेशन सेंटर, क्रिएटिव्हिटी सेंटर आणि कंटेंट डेव्हलपमेंट सेंटर'ची स्थापना केली जाणार आहे.''